**-:प्रेस नोट:-दि.२२/०७/२०१९**

**स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**महीला व मुलगा यांना आत्महत्या करण्यापासुन वाचविले बाबत**

दि.२२/०७/२०१९ रोजी स्वारगेट मार्शल वरील कर्मचारी पोलीस हवालदार ४४९ एन एन केंजळे व पोलीस शिपाई १०२९९ पी ए सानप हे पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की एक महिला तीचे मुलासह स्वारगेट कॅनॉल येथे देण्याचा प्रयत्न करीत आहे. पोहवा केंजळे व पोशि सानप यांनी तात्काळ स्वारगेट कॅनॉल येथे जाऊन सदर महिला व मुलास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन येथे घेऊन आले. सदर महिला हीस तिचे व मुलाचे नाव विचारता तीने तीचे नाव व मुलाचे नाव सांगुन पती यांचेबरोबर भांडण झाल्याने कॅनॉल मध्ये जीव देण्यास आले असल्याचे सांगितले. सदर महिला हिचेकडुन तिचे पती यांचा मोबाईल नंबर घेऊन त्यावर संपर्क साधुन त्यांना स्वारगेट पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले. सदर महिला व तिचा मुलगा यांना महिलेचे पती याचे ताब्यात देण्यात आले. किशोर बापु सातपुते यांनी पोलीसांचे आभार मानले.

**(अशोककदम)**
**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
**स्वारगेट पोलीस ठाणे,पुणे शहर**